# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,

दापोली ४१५ ७१२, जि. रत्नागिरी.

# नागरिकांची सनद

**प्रस्तावना:**

**भौगोलिक महत्व**

महाराष्ट्रातील भौगोलिक विविधतेवर आधारित कृषि हवामान विभागांचा विचार करून १९७० च्या दशकात राहुरी, अकोला व परभणी येथे प्रतिनिधिक स्वरूपात करण्यात आलेली कृषि विद्यापिठांची स्थापना म्हणजे कृषि प्रगतीच्या दिशेने उचललेले महत्वाचे पाऊल होय. विदर्भ, मराठवाडा, प. महाराष्ट्र यांच्या तुलनेत कोकणचे हवामान पूर्णत: वेगळे असून भरपूर पर्जन्यवृष्टीमुळे येथील पीकपद्धतीदेखील संपूर्णपणे भिन्न आहे.

सहयाद्रीच्या पर्वतराजीने वेढलेल्या, डोंगरदऱ्यांनी व्यापलेल्या कोकणाचे प्रामुख्याने उत्तर कोकण व दक्षिण कोकण असे दोन भाग पडतात. येथे अनुक्रमे भात–आधारित व फलोदयानावर आधारित अशा पीकपद्धती प्रचलित आहेत. कोकण अंतर्गत रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे व रायगड या चार जिल्हयांचा विचार करता 'दापोली' हे ठिकाण उत्तर व दक्षिण विभागातील हवामान व पर्जन्यमानाचे प्रतिनिधित्व करणारे असून मध्यवर्तीदेखील आहे. शिवाय किनारपटटीलगतचा प्रदेश असल्याने येथे मत्स्यविषयक संशोधनाचे ध्येय देखील शासनाने डोळयासमोर ठेवले होते. एकंदरित कृषि क्षेत्राशी निगडित आणि पूरक व्यवसायांना चालना मिळून कोकणामध्ये कृषिक्षेत्राची भरभराट व्हावी याकरिता कोकण कृषि विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.

**उद्‌देश**

कोकणातील जमिनींची पाणी धारण करण्याची क्षमता अत्यल्प असून या जमिनी कमी सुपिक आहेत. येथील डोंगराळ हवामान भूभाग उष्ण व दमट असल्याने येथील शेतजमिनींचे विभाजन झाल्याचे आढळते. त्याचप्रमाणे वार्षिक पर्जन्यमानदेखील सरासरीपेक्षा खूपच अधिक असल्याने दरवर्षी जमिनीची मोठया प्रमाणावर धूप होऊन जमिनीतील पोषक द्रव्यांचा ऱ्हास होतो. अशा हवामानात तग धरून राहणाऱ्या पिकांमध्ये संशोधन व त्यासाठी आवश्यक असणारे उत्पादन तंत्र विकसित करण्याकरिता कोकणामध्ये स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यात आले.

**प्रमुख जबाबदाऱ्या**

विद्यापीठ स्थापनेपूर्वी कोकणातील शेतीखालील क्षेत्र अत्यल्प असून तरूण पिढीचा ओघ प्रामुख्याने अर्थार्जनाकरिता शहरांकडे असे. ज्येष्ठ नागरिक बहुधा चरितार्थाकरिता मनी ऑर्डरवर अवलंबून असत.

त्यामुळे साहजिकच येथील मुबलक नैसर्गिक साधनसंपत्तीचा म्हणावा तसा उपयोग केला जात नसे. दुसरे म्हणजे, शहरांतील लोकसंख्येत वाढ झाल्यामुळे तेथील उपलब्ध साधन संपत्तीवर ताण पडू लागला. यावर उपाय म्हणून कृषि क्षेत्रातील संशोधनाद्वारे शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान विकसित करून ग्रामीण युवकांचा शेतीकडे व्यवसायाभिमुख दृष्टीकोन निर्माण करणे ही विद्यापीठाची प्रमुख भूमिका आहे.

ग्रामीण युवकांचे शहराकडील स्थानांतरण रोखण्यासाठी कोकणामध्ये कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार कार्याद्वारे जनजागृती करून येथील शेतकऱ्यास स्वयंपूर्ण बनविणे ही विद्यापिठाची प्रमुख कर्तव्ये होत.

**कृषि शिक्षण**

घटक महाविद्यालये – ६

कायम विनाअनुदानीत महाविद्यालये – २३

कृषि तंत्र विद्यालय (घटक) – २

कृषि तंत्र विद्यालय (संलग्न) – २

कायम विनाअनुदानित कृषि तंत्र विद्यालय – ३४

मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम – १

बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम – २

संशोधन केंद्रे – १८

## संशोधन :

जैविक विविधतेने संपन्न अशा जगातील १२ विभागात गणना झालेल्या पश्चिम घाट प्रदेशात कोकणचा समावेश होतो. मात्र जैविक विविधतेने श्रीमंत असूनही कोकणात हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या पिकांचीच लागवड केली जाते. जनतेच्या गरजा तसेच व्यापारीदृष्ट्या महत्व यानुसार त्या त्या विभागातील जमीन, पाणी, हवामान यांना अनुरुप शेती पध्दती विकसित होणे गरजेचे आहे. यादृष्टीने डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे महत्वाचे योगदान आहे.

### प्राधान्य पिके :

**भात** हे कोकणातील महत्वाचे तृणधान्य पीक असून सदर पिकांची लागवड विभागामध्ये ४.२९ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर केली जाते. सन १९७२ मध्ये विद्यापीठाची स्थापना झाल्यापासून आजतागायत भाताच्या अधिक उत्पादन देण्याऱ्या २८ जाती विद्यापीठाने प्रसारीत केल्या आहेत. सदर जातींची फक्त कोकण विभागात लागवड केली जात नसून सदर जाती परदेशात लॅटीन अमेरीका, आफ्रीकामध्ये सुध्दा प्रसिध्द आहेत. हेक्टरी ५५ ते ७५ क्विंटल उत्पादन देणाऱ्या सह्याद्री, सह्याद्री २ ते ५ या जाती विकसीत केल्याने भाताच्या उत्पादनामध्ये मोठी वाढ झालेली आहे. विद्यापीठाने विकसित केलेल्या भाताच्या विविध तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे कोकणातील भाताची प्रति हेक्टरी उत्पादनक्षमता ही राज्य व देशापेक्षा अधिक आहे.

**नागली** हे भातानंतर कोकणातील एक महत्वाचे पीक असून सदर किांची सुमारे ६८००० हेक्टर एवढ्या क्षेत्रावर लागवड केली जाते. नागलीच्या दापोली-१, दापोली सफेद-१ या सुधारीत जातींची लागवड केल्यामुळे हेक्टरी १२ ते १५ क्विंटल उत्पादन मिळते. दाण्यामधील उत्तम पौष्टिकतेमुळे नागलीचा वापर मोठ्या प्रमाणावर बेबीफुडमध्ये केला जातो. नाचणी सत्व, पापड या उत्पादनांना शहरामध्ये प्रसिध्दी मिळाली आहे. त्यामुळे नागली हे फक्त गरीबांचे अन्न ही कल्पना आता बदलत आहे. व्यापारी दृष्टीकोनातून नागलीची लागवड प्रक्रिया व व्यापार करणे महत्वाचे आहे.

कोकणात खरीपात कंदपीकांचे उत्पादन चांगले होते. कंदपिकावरील संशोधनाकरीता एक स्वंतत्र योजना मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली येथे कार्यरत आहे.

**भुईमूग** या अपारंपारीक गळीतधान्य पिकांची कोकण विभागात लागवड ही विद्यापीठासाठी प्रमुख उपलब्धी आहे. कोकणात रब्बी हंगामात भुईमूगाची उत्पादकता २० क्विंटल/हेक्टर एवढी असून राज्यातल्या सरासरी उत्पन्नापेक्षा जास्त आहे. विद्यापीठाने कोकण गौरव आणि कोकण टपोरा या जास्त उत्पादन देणाऱ्या जाती विकसित केल्या असून त्याची उत्पादकता १८.२२ क्विंटल/हेक्टरी एवढी आहे. खरीप भातानंतर ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता आहे तेथे भुईमूग हे पीक अतिशय किफायतशीर आहे.

**घेवड्याचे** कोकण भुषण, **वालाच्या** कोकण वाल-१ आणि कोकण वाल-२, **कुळीथाची** दापोली-१, **तुरीची** कोकण तूर-१, **चवळीच्या** कोकण सदाबहार आणि कोकण सफेद हे वाण कोकण विभागात लागवडीसाठी विद्यापीठाने विकसित करुन प्रसारीत केलेले असून शेतकरी खरीप भातानंतर या कडधान्याची लागवड करीत आहेत.

**फलोत्पादन** हे कोकणचे खास वैशिष्ट्य असून या विभागातील अर्थव्यवस्थेचा तो मुलाधार आहे. कोकणात आंबा, काजू, कोकम, फणस इत्यादी कोरडवाहू फळपिके होतात. तर नारळ, चिकू आणि सुपारी ही महत्वाची बागायती पिके आहेत. कोकणाला वरदान लाभलेल्या आंबा आणि काजू या पिकांवर विद्यापीठाने महत्वपूर्ण संशोधन केले असून ते देशात आणि विदेशातही मान्यता पावले आहे. यामध्ये अभिवृध्दी, सुधारीत जातींची निर्मिती, खतांचा वापर, संजीवकाचा वापर, कीड आणि रोगांचे नियंत्रण या बाबी महत्वाच्या आहेत. आंब्याच्या 'रत्ना', 'सिंधू', 'कोकण रुची', 'सुवर्णा' या नवीन जाती, नारळाच्या 'प्रताप, बाणवली, टी x डी, डी x टी-२' या जाती तसेच काजूच्या 'वेंगुर्ला-१' ते 'वेंगुर्ला-८' या जाती म्हणजे विद्यापीठाच्या फलोद्यान क्षेत्रातील संशोधन कार्याचा मानाचा तुरा आहे. तसेच नारळाची 'लक्षद्वीप' ऑर्डीनरी, सुपारीची श्रीवर्धिनी, जांभळाची बहाडोली, करवंदाची कोकण बोल्ड, फणसाची कोकण प्रॅालिपीक, दालचिनीची कोकण तेज व पानांसाठी कोकण तेजपत्ता, कोकमाची कोकण अमृता व कोकण हातिस, जायफळाच्या कोकण सुगंधा, कोकण स्वाद व कोकण श्रीमंती अशा चांगल्या प्रकारच्या अधिक उत्पादन देणाऱ्या जाती विकसित केल्या आहेत. त्याचबरोबर कोय कलम, मृदकाष्ट कलम, गुटी कलम अशा विविध अभिवृध्दीच्या सोप्या पध्दती या पिकासाठी विकसित करण्यात आल्या आहेत. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने तयार करुन प्रसारीत केलेल्या ८५ हून अधिक अत्याधुनिक वाणांमुळे व तंत्रज्ञानामुळे कोकणच्या कृषि उत्पादनामध्ये भरीव वाढ झाली आहे. फलोत्पादन विकास मोहिमेमुळेही फळपिकांखालील क्षेत्रात लक्षणीय वाढ होत आहे.


**प्रक्रिया-** फळांचे नाशिवंत स्वरुप लक्षात घेऊन फळांवर प्रक्रिया करुन त्यापासून विविध टिकाऊ पदार्थ तयार करण्याचे तंत्रज्ञान विद्यापीठाने विकसित केले आहे. कोकणात उत्पादित होणाऱ्या विविध फळांपासून टिकाऊ पदार्थ बनविण्याच्या पध्दती विद्यापीठाने प्रमाणित केल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने कच्च्या आंब्यापासून लोणचे, चटणी, पन्हे, स्क्वॅश, मुरांबा इ. आणि पिकलेल्या आंब्यापासून आमरस, आंबापोळी, जॅम, नेक्टर, स्क्वॅश, आंबा पावडर, काजू बोंडापासून सिरप, जॅम, मूरांबा, कँडी, बर्फी, फेणी, वाईन इत्यादी कच्च्या करवंदांपासून लोणचे, जॅम, जेली, वाईन इत्यादी, फणसापासून लोणचे, जॅम, मुरांबा, फणसपोळी, फणस चिप्स इ. कोकमापासून आमसूल, कोकम सरबत (अमृत), कार्बोनेटेड कोकम नेक्टर, आगळ, कोकम तेल इत्यादींचा समावेश आहे.

**मत्स्य** विद्याशाखेमार्फत शास्त्रज्ञांनी मत्स्य व्यावसायिकांना उपयोगी पडाव्यात अशा विविध संशोधन शिफारसी दिलेल्या आहेत. यामध्ये जाळींचा आस किती असावा, मत्स्यबीज उबवणी यंत्र, गोऱ्या पाण्यातील मत्स्य मत्स्य संवर्धनावरील काही शिफारसीमध्ये किती बीज सोडावे, त्यांचे खाद्य काय असावे, किती प्रमाणात असावे, मत्स्य बीज वाहतुक, निमखाऱ्या पाण्यातील बीज संवर्धन, कोळंबीची साठवणूक, गोड्या पाण्यातील कोळी संवर्धन, खेकडा पुष्टीकरण, खेकडा संवर्धन आणि शोभिवंत मासे याबाबतच्या शिफारसींचा समावेश आहे.

मासेमारांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी माशांवर प्रक्रिया करुन विक्री करणे ही आजच्या आधुनिक काळाची गरज आहे. याचा विचार करुन विद्यापीठाने कमी किमतीच्या मासळीपासून मत्स्य पदार्थ तयार करण्याचे तंत्रज्ञान विकसित केले आहे. यात प्रामुख्याने कोळंबीचे लोणचे, जवळा चटणी, मत्स्य बटाटे वडे, फिश कटलेट, मत्स्य शेव, मत्स्य चकली, सुप पावडर, मत्स्य कुरकुरु यांचा समावेश आहे.

**यांत्रिकीकरण-** शेतीच्या कामासाठी वेळेत मजूरवर्ग न मिळणे व मजूरीचे वाढलेले दर यामुळे उत्पादन खर्च वाढतो. यामुळे यंत्रे व अवजारांमार्फत कमी वेळेत शेतीची कामे करणे ही काळाची गरज आहे. विद्यापीठाने भात कापणीसाठी वैभव विळा, नूतन आंबा झेला, भुईमूगाला भर देण्यासाठी स्वस्तीक अवजार, अमर बांडगुळ कटर, अंकूर दातेरी फावडे, पंकज चिखलणी यंत्र, अतूल चिकू झेला, दातेरी कोळपे, नारळ सोलणी यंत्र, कोकण फळे कापण्याचे यंत्र, फणस गरे चिरण्याचे यंत्र, काजू बिया फोडणी यंत्र, पालापाचोळा बारीक करण्यासाठी श्रेडर, स्वयंचलित मळणी यंत्र, सुपारी काढणी यंत्र, काजू बोंडापासून रस काढण्याचे यंत्र इत्यादी यंत्रांची/अवजारांची निर्मिती केली आहे.

# विस्तार शिक्षण संचालनालय



**शिक्षण: विविध अभ्यासक्रम**

कृषि संशोधनाद्वारे निर्माण केलेले आधुनिक तंत्रज्ञान विदयार्थ्यांस देऊन या क्षेत्रात शास्त्रज्ञ व संशोधकांची निर्मिती व्हावी या उद्देशाने विद्यापिठांतर्गत घटक व संलग्न महाविद्यालये व्हावी तंत्र विद्यालये आणि कृषि तंत्र निकेतन यांचेमार्फत पुढीलप्रमाणे अभ्यासक्रम राबविले जातात.

**१) पदव्युत्तर अभ्यासक्रम**

पी. एच. डी. (कृषि), पी. एच. डी. (कृषि अभियांत्रिकी), पी. एच. डी. (मत्स्य), एम्. एस्सी. (कृषि), एम्. एस्सी. (उद्यान), एम्. टेक. (कृषि अभियांत्रिकी), एम्. एफ. एस्सी. (मत्स्य), एम्. एस्सी. (पीएच्एम), एम्. एस्सी. (वन), एम्. एस्सी. (कृषि जैवतंत्रज्ञान),

**२) पदवी अभ्यासक्रम**

बी. एसस्सी. (कृषि), बी. एसस्सी. (उद्यान), बी. टेक. (कृषि अभियांत्रिकी), बी. टेक. (अन्नतंत्र), बी. एसस्सी. (मत्स्य), बी. बी. ए. (कृषि), बी. एसस्सी. (कृषि जैवतंत्रज्ञान)

**३) पदविका अभ्यासक्रम**

कृषि तंत्र पदविका, मत्स्य अभियांत्रिकी

**४) बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम**

वरीलप्रमाणे कृषिमध्ये पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण घेऊन ग्रामीण युवकांनी स्वत:च्या पायावर उभे रहावे तसेच, प्राप्त ज्ञानाचा विनियोग कृषीचा आणि पर्यायाने राष्ट्राच्या उन्नतीकरिता करावा यासाठी विद्यापीठ सतत प्रयत्नशील आहे.

कृषि पदविका आणि बागकाम तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रमाद्वारे युवकांना स्वत:चा शेतीपूरक व्यवसाय करण्यास उदयुक्त केले जाते. याद्वारे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारून त्यांचे राहणीमान उचावण्यास मदत होत आहे.

**विस्तार शिक्षण**

विद्यापीठामार्फत केलेले संशोधनाचा लाभ शेतकऱ्यांना व्हावा यासाठी विविध कार्यक्रमांद्वारे कार्याचा प्रसार व प्रचार केला जातो.

| | | |
|---|---|---|
| जिल्हा मासिक चर्चा सत्र | निदान चमू भेटी | चर्चासत्र/कार्यशाळा |
| विषय विशेषज्ञांचे प्रशिक्षण | प्रशिक्षकांचे प्रशिक्षण | फिरते पिक चिकित्सालय |
| व्यावसायिक प्रशिक्षण | शेतकरी मेळावे | दूरदर्शन कार्यक्रम |
| विशेष दिन | कृषि प्रदर्शन | तंत्रज्ञान प्रसिद्धी (लेख) |
| मोहिमा | कृति प्रात्यक्षिके | शेतकरी शास्त्रज्ञ मंच |
| परिणाम पिक प्रात्यक्षिके | प्रथमदर्शी पिक प्रात्यक्षिके | वैयक्तीक संपर्क |
| शेतकऱ्यांच्या शेतावरील चाचण्या | गट चर्चा | शेतकरी व कृषि कर्मचाऱ्यांकरीता एस एम एस सेवा पूरविणे |
| पत्राद्वारे शेतकऱ्यांना मार्गदर्शन | फिरती कृषि प्रदर्शने | आकाशवाणी कार्यक्रम |
| प्रक्षेत्र भेट | व्हॉटस् अप ग्रुप | सामंजस्य करार (शासकीय/अशासकीय) |
| विद्यापीठ वार्तापत्र | कृषि दिनदर्शिका | कृषि दैनंदिनी |

**विद्यापीठाकडून पूरवल्या जाणाऱ्या सुविधा**

**तांत्रिक मार्गदर्शन व सल्ला**

केंद्र/राज्य शासन/भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचेकडून आखून आलेल्या प्रमाणकानुसार व विषयानुसार तंत्रज्ञान प्रसारासाठी शेतकरी प्रशिक्षण/मेळावे/चर्चासत्रे आयोजित केली जातात. या व्यतिरिक्त विविध शासकीय विभाग, स्वयंसेवी तसेच खाजगी संस्था यांनी आयोजित केलेल्या विस्तार उपक्रमांमध्ये सहभाग घेतला जातो. आकाशवाणाी व दूरदर्शनवरून वेळोवेळी शेतीविषयक माहिती प्रसारीत केली जाते. छापील साहित्य उदा. कृषि दैनंदिनी, विविध पुस्तिका ही प्रकाशने विद्यापीठाने निश्चित केलेल्या दरात पुरविली जातात. तसेच विविध वृत्तपत्रातून आणि कृषि विषयक मासिके, पाक्षिके, यामधून लेख प्रसिध्द करून माहिती दिली जाते. कृषि प्रदर्शने, व्हिडीओ/सीडी, संगणक/इंटरनेटवरून सर्व पिकांची व इतर मोफत माहिती पुरविली जाते. याशिवाय दापोली येथे कृषि तंत्रज्ञान व माहिती केंद्रामध्ये कृषि संग्रहालय स्थापन करण्यात आले आहे.

**बि बियाणे व कलमे /रोपे पुरवठा**

जातीवंत बियाणे व कलमांचे वितरण शेतकऱ्यांना मोठया प्रमाणावर करण्यात येते. सन २०११–१२ या वर्षात एकूण ६६९२ क्वि. बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध केले गेले. यामध्ये मुख्यत्वे

भात, नागली, तेलपिके, कडधान्ये आणि भाजीपाला यांचा समावेश होता. याव्यतिरिक्त विविध फळ पिके व मसाला पिकांची २२.५० लाख कलमे/रोपे उपलब्ध करण्यात आली होती आणि काजू बिया ९०० क्वि. तसेच ८५००० नारळ रोपांकरीता उपलब्ध करण्यात आली.

**धोरनात्मक निर्णयासाठी सर्वेक्षण व सल्ला**

शासन स्तरावर तसेच विविध संस्थांकरीता शेतीविषयक धोरणे ठरविण्यासाठी आणि इतर तांत्रिक बाबींसाठी विद्यापीठातर्फे दिशादर्शक मार्गदर्शन करण्याकरीता मनुष्यबळ उपलब्ध आहे. शेतीशी निगडीत असलेल्या धोरणात्मक बाबींकरीता सर्वेक्षण व सल्ला विद्यापीठामार्फत दिला जातो.

**शेतकरी प्रशिक्षण**

विद्यापीठाने संशोधन केलेले शेतीतील प्रगत तंत्र शेतकऱ्यांनी अवलंबवावे याकरीता शेतकऱ्यांचे प्रशिक्षण वर्ग घेतले जातात. ज्याद्वारे शेतकऱ्यांना नविन संशोधनाची माहिती दिली जाते. तसेच लघुउद्योग आणि गृह उद्योग करण्यासाठी विविध प्रशिक्षण वर्ग युवकांसाठी व महिलांसाठी राबविले जातात.

**तक्रारीचे निवारण:**

वरील विषयाच्या अनुषंगाने सेवा, सल्ला किंवा माहिती अथवा मार्गदर्शनाचे काम सुरळीतपणे न झाल्यास खालील अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदविता येईल.

१. संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
२. संचालक, संशोधन, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
३. संचालक, शिक्षण, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
४. सहयोगी अधिष्ठाता, कृषि/वनशास्त्र/कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली/ मत्स्य महाविद्यालय, रत्नागिरी
५. सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र वेंगुर्ले/ प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत
६. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली, ता. दापोली
७. कुलसचिव, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

**संपर्क:** कुलसचिव, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

दूरध्वनी क्र. – ०२३५८–२८२०६५

फॅक्स क्र.– ०२३५८– २८३०६५

**संकेत स्थळ** : www.dbskkv.org